| MHKO160008442022 | |
|---|---|
| | दाखल तारीख - २५/११/२०२२ |
| | नोंदणी तारीख - २५/११/२०२२ |
| | निकाल तारीख - २७/०२/२०२४ |
| | कालावधी - ०१ वर्षे ०३ महिने ०२ दिवस |

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२६१/२०२२ निशानी क्र.

## भाग अ

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(i) अन्वये )

## शाहूवाडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
## ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांचे न्यायालयात

( पिठासिन अधिकारी - अमोल श्रीराम शिंदे यांचेसमोर )

न्यायनिर्णय घोषित – दिनांक २७/०२/२०२४

( संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२६१/२०२२ )

| मो.वा.का.क.रजि.क्र.०५/२०२२, शाहुवाडी पो. ठाणे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | :- | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पो. ठाणे,<br>ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | :- | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती आर. आर. देशपांडे |
| आरोपीं | :- | सुयश लक्ष्मण पाटील, व.व.२०,<br>रा.मोळवडे, ता. शाहुवाडी, जि.कोल्हापुर |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | :- | श्री. जे. एस. काकडे |

## भाग ब

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २८/०४/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २५/११/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०१/०९/२०२३ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | २३/०२/२०२३ |
| न्यायनिर्णसाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २७/०२/२०२४ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेश | :- | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडलेचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुयश लक्ष्मण पाटील | ०९/०२/२३ | ०९/०२/२३ | मोटार वाहन कायदा कलम ३/१८१ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |

## भाग क

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii) अन्वये )

अ   अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | प्रसाद दिलीप कोळपे,पो.उ.नि. | तपासी अधिकारी | १० |

क   न्यायालयातर्फे निशाणी -(फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | दोषारोपपत्र |
| २ | नि.१ सोबत | अटकेचे नमुने |
| ३ | नि.१ सोबत | निवेदन |
| ४ | -- | फिर्याद |

==================================

<u>न्यायनिर्णय</u>

<u>(घोषित दि. २७/०२/२०२४)</u>

==================================

१. आरोपीविरूध्द मोटार वाहन कायदा कलम ३/१८१ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप ठेवून संपरिक्षित करण्यात आले आहे.

२. अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात अशी की, -

घटना ही दि.२८/०४/२०२२ रोजी संध्याकाळी ६.०० वा. चे सुमारास मोळवडे ते करंजोशी जाणारे रोडवर बापू साने यांचे घराजवळ घडली. त्यावेळी अशोक कांबळे हे करंजोशी ते मोळवडे या गावी दुचाकीवर जात होते, त्यावेळी आरोपी मोळवडेकडून करंजोशीकडे जात होते, त्यावेळी अशोक कांबळे हे रॉंग साईडने जावून त्यांचे गाडीला जावून धडकले, त्या अपघातात अशोक कांबळे हे मयत झाले, त्याप्रमाणे शाहुवाडी पो.ठाणेत फेटल गु.रं.नं.१२५/२०२२ हा दाखल झाला. अपघातावेळी आरोपीकडे ड्रायव्हींग लायसन्स नव्हते, त्यामुळे आरोपीविरूध्द मो.वा.कायदा कलम ३/१८१ प्रमाणे खटला पाठविला होता, तसेच सिध्देशने आरोपीस त्यांचेकडील वाहन चालक परवाना नसताना गाडी चालविणेस दिली म्हणून सिध्देशविरूध्द मो.वा.का.क. ५/१८१ प्रमाणे नि.१ नुसार खटला पाठविणेत आला होता.

३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपी याचेविरूध्द शाहूवाडी मो.वा.का.क.रजि.क्र.०५/२०२२ हा दाखल होवून त्याचा तपास प्रसाद दिलीप कोळपे, पो.उ.नि. यांचेकडे वर्ग झाला होता. तपासअधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपासाअंती आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र मो.वा.का.कलम ३/१८१ प्रमाणे दाखल केले आहे.

४. मी आरोपीविरूध्द निशानी ०८ येथे दोषारोप निश्चित केला आहे. आरोपी यांना निशानी ०८ वरील दोषारोप वाचून, समजावून सांगितला असता त्यांनी अपराधाची कबूली दिली नाही आणि संपरिक्षेची तयारी दर्शविली. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे जबाब नि.११ वर नोंदविण्यात आलेला असून त्याने सर्व

प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

५. अभियोग पक्षाचा खटला, अभिलेखावरील पुरावा यावरून माझे विचारार्थ खालील मुद्दे आले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपीने दिनांक २८/०४/२०२२ रोजी सायं. ०६.०० वा. चे सुमारास विद्यामंदीर मोळावडे जवळ असले बापू सोने यांचे घराचे समोर रोडवर वाहन चालविणेचा परवाना नाही हे माहीती असताना सुध्दा मोटार सायकल चालविली आणि त्याद्वारे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम ३/१८१ प्रमाणे माझ्या आखत्यारित गुन्हा केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिंमासा

## मुददा क्र. १ करीता -

६ अभियोगपक्षाने त्यांची बाजू सिध्द करण्यासाठी प्रकरणामध्ये सदर प्रकरणातील तपासी अधिकारी या एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे.

७. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र १ हे घटनेमध्ये तपासी अधिकारी असून त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये कथन केले की ते सन २०२२ साली पी.एस.आय. म्हणून शाहुवाडी पो. ठाणेत कार्यरत होते, घटना दि.२८/०४/२०२२ रोजी मोळवडे ते करंजोशी जाणारे रोडवर बापू सोने यांचे घराजवळ संध्याकाळी ६.०० वा.चे सुमारास घडली, अशोक कांबळे हे करंजोशी ते मोळवडे या गावी दुचाकीवर जात होते, त्यावेळी आरोपी मोळवडेकडून करंजोशीकडे जात होता, अशोक कांबळे हे रॉग साईडने जावून आरोपीचे गाडीला जावून धडकले, त्या अपघातात अशोक कांबळे हे मयत झाले, त्याप्रमाणे शाहुवाडी पो.ठाणेत फेटल गु.रं.नं.१२५/२०२२ हा दाखल होता, त्यावेळी आरोपीकडे ड्रायव्हींग लायसन्स नव्हते, त्यामुळे त्यांनी आरोपीविरूध्द मो.वा.कायदा कलम ३/१८१ प्रमाणे खटला पाठविला होता, सिध्देशने आरोपीकडे वाहन चालक परवाना नसताना सिध्देशने त्यास गाडी चालविणेस दिली म्हणून सिध्देशविरूध्द मो.वा.का.क. ५/१८१ प्रमाणे नि.१ नुसार खटला पाठविणेत

आला.  सदर साक्षीदाराचा आरोपीचे वकिलांनी उलटतपास घेतला असता त्याने कथन केले की अपघाताची नोंद ही अंदाजे अपघातानंतर नऊ दिवसांनी झाली, त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला व मयताचे प्रमाणपत्र प्राप्त केले, अशोक कांबळेचे खिशामध्ये दारूची बाटली सापडली, तसेच आरोपीस परवाना हजर करणेबाबत नोटीस दिलेबाबत त्यांना आठवत नाही, सिध्देशकडे लायसन्स व गाडीचे मालकीचे प्रमाणपत्र आहे, घटनंतर १२ दिवसांनी तेथील जमलेल्या लोकांनी घडलेले घटनेबाबत त्यांना जबाब दिले.  इतर प्रश्नांची त्याने नकारार्थी उत्तरे दिली.

८.  प्रस्तुत अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीवरचा दोषारोपातील गुन्हा शाबित होत नाही. सदरची घटना घडल्याचा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही.  यातील साक्षीदार क्र. १ यांनी उलटतपासात कथन केले की त्यांनी आरोपीस परवाना हजर करणेबाबत नोटीस दिलेबाबत त्यांना आठवत नाही.  त्यामुळे सरकारी पक्षाचे केसमध्ये संशय निर्माण होतो. सदर साक्षीदाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही साक्षीदाराची साक्ष सदरकामी अभियोग पक्षाने नोंदविलेली नाही. तसेच यातील मयत अशोक कांबळेचे खिशामध्ये दारूची बाटली सापडलेबाबत साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले आहे. एकंदरीत सदरची घटना ही आरोपीचे चुकीमुळे झाली किंवा तो सदरची गाडी चालवित होता, तसेच त्याचेकडे गाडीविणेचा परवाना नव्हता अशी कोणतीही घटना अभिलेखावरील पुराव्यावरून शाबित झालेली नाही. सबब, आरोपीवरील ठेवण्यात आलेले दोषारोप हे सबळ पुराव्यानिशी सिध्द झालेले नाहीत. सबब, आरोपीस संशयाचा फायदा देऊन ते प्रस्तुत प्रकरणामध्ये निर्दोष सुटण्यास तो पात्र आहे.

९.  सबब, अभियोग पक्षाचे अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीविरूध्दचा दोषारोपामध्ये नमूद गुन्हा शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपी प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब वर नमूद चर्चेस अनुसरून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी असा नोंदवित आहे आणि मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१.  आरोपी सुयश लक्ष्मण पाटील यांची मोटार वाहन कायदा कलम ३/१८१ या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

२.	आरोपीचा जामीनकदबा रदद करणेत येवुन त्यास या गुन्ह्यातून स्वांतत्र्य देण्यात येत आहे.

३.	आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ अ प्रमाणे जामीन दयावा.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2024.03.03 11:20:39 +0530

स्थळ - शाहूवाडी
दिनांक – २७/०२/२०२४

( अमोल श्रीराम शिंदे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
मलकापुर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर

**CERTIFICAT E**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | P.A. Vasudeo |
| Name of Court | Amol Shriram Shinde, C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi |
| Date of Dictation | 27/02/2023 |
| Judgment signed by the P.O.on | 27/02/2023 |
| Judgment uploaded on | 27/02/2023 |